नि. दि. दावा क्र.३५३/२०१५
रामराव वि. काशिनाथ व इतर
CNR NO.MHLA120015872015

## निशाणी क्र.६२ वरील आदेश

१. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच दोन्ही बाजूच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला व सदर प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. सदरचा अर्ज वादीने वाद मिळकतीची मोजणी करणेकामी कोर्ट कमिशनरची नेमणूक करण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास तिव्र विरोध दर्शविला आहे व सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. सदरचा दावा वादीने अतिक्रमण करुन बेकायदेशीररित्या घेतलेला ताबा परत मिळणेकामी दाखल केला आहे. सदर प्रकरणातील दाव्यामधील व कैफियतीमधील कथनावरुन पक्षकारांमध्ये अतिक्रमणाबाबत वाद असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रकरणातील पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व दाव्यातील मागणी विचारात घेवून माझे असे मत झाले आहे की, सदर प्रकरणामधील पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी वादीच्या मिळकतीची मोजणी ही मोजणी विभागातील तज्ञांमार्फत होणे आवश्यक आहे. तसेच अर्जात मागणी केल्याप्रमाणे वादीच्या खर्चाने वाद मिळकतीची मोजणी झाल्यास कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, वादाचा निपटारा होणार आहे. पक्षकारांमध्ये वादाच्या स्वरुपावरुन माझे असे मत झाले आहे की, अर्जात मागणी केल्याप्रमाणे कोर्ट कमिशनरची नेमणूक करणे न्यायोचीत होणार आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

| | |
|---|---|
| १. | नि.क्र.६२ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | उपअधिक्षक, भुमी अभिलेख, शिरुर अनंतपाळ यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येते. |
| ३. | कोर्ट कमिशनर यांनी मौजे शिरुर अनंतपाळ, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर येथील सर्वे क्र.८५ (नवीन सर्वे क्र.३०/८५) पैकी क्षेत्र ०४ हे. ८६ आर ची सातबारा उताऱ्याप्रमाणे मोजणी करुन त्याचे क्षेत्र स्वतंत्र दर्शवून मोजणी नकाशासह अहवाल लवकरात लवकर सादर करावा. |
| ४. | मोजणीच्या वेळी मिळकतीमध्ये अतिक्रमण आढळून आल्यास सदर अतिक्रमण क्षेत्रासह नकाशामध्ये स्पष्टपणे दर्शवून कोर्ट कमिशनर यांनी अहवाल दाखल करावा. |
| ५. | उपअधिक्षक, भुमी अभिलेख, शिरुर अनंतपाळ यांना दावा मिळकतीची मोजणी करतेवेळी लगत गटाची मोजणी करणे आवश्यक असल्यास त्यांना तशी परवानगी देण्यात येत आहे. |
| ६. | कोर्ट कमिशनर यांनी पक्षकारांना आगाऊ नोटीस काढून मोजणीबाबतची कार्यवाही करावी. |
| ७. | संबंधीत पक्षकारांनी नियमाप्रमाणे संबंधित विभागाकडे मोजणी फी भरावी. |
| ८. | वर नमूद केल्याप्रमाणे कोर्ट कमिशनरला पत्र द्यावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
SHAIKH NAZAKATBI
ABDUL LATIF
Date: 2022.10.07
18:04:29 +0530

निलंगा. (एन.ए.एल. शेख)
दि.०७/१०/२०२२ २रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, निलंगा.